E-279326

मुळ ई-निविदा



# E-TENDER DOCUMENT

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

### कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणे बाबतची ई-निविदा.

### सन २०२४ – २०२५

(कार्यादेश दिलेचे तारखेपासून १२ महिने कालावधीकरीता)

E-TENDER DOCUMENT

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणे बाबतची ई-निविदा.

सन २०२४ – २०२५

## अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १ | ई-निविदा मागविण्याबाबतची नोटीस | १ |
| २ | ई-निविदा धारकांची माहिती | २ ते ३ |
| ३ | ई-निविदेच्या अटी शर्ती | ४ ते ९ |
| ४ | मनुष्यबळ संख्येचा तपशिल | १० ते ११ |
| ५ | सर्वसाधारण शैक्षणिक पात्रता | १२ ते १५ |
| ६ | तांत्रिक निविदा संबंधित सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे | १६ ते १७ |
| ७ | निविदाधारकाने भरावयाची व्यावसायिक निविदा | १८ ते १९ |
| ८ | निविदाधारकाने दयावयाचे हमीपत्र | २० |
| ९ | व्यावसायिक बोली (Bill of Quantities) | २१ |

E-TENDER DOCUMENT




# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

**पो.शिर्डी- ४२३ १०९, ता.राहाता जिल्हा-अहमदनगर**

फोन नं. (०२४२३) २५८५००, २५८८१०

( **Website** - www.shrisaibabasansthan.org.in / www.sai.org.in , **E-Mail** - labour@sai.org.in)


## ई- निविदा सूचना

| अ.नं. | ई- निविदेचा तपशील | ई-निविदा शुल्क रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | सन २०२४-२५ (कार्यादेश दिलेचे तारखेपासून १२ महिनेकरीता) या कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबत. | १५,०००/- अक्षरी रु. पंधरा हजार मात्र (विना परतावा) | ४,००,०००/- अक्षरी रुपये- चार लाख मात्र |

१) ई-निविदेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) ई-निविदेसंबंधी कागदपत्रे डाउनलोडींगसाठी दि.२२/५/ २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. पासून उपलब्ध आहेत.

३) प्री बीड मिटींग दि.२८/०५/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता श्री साईबाबा मंदिर परिसरातील साई सभागृह (लेंडीबाग) येथे होईल. काही कारणास्तव या तारखेत बदल झाल्यास नवीन तारीख वेबसाईटवर कळविण्यात येईल.

४) ई-निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मूदत दि. ८/६/२०२४ सायं.०५.०० वा.पर्यंत आहे.

५) ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६) तांत्रिक ई-निविदा संबंधित सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशिल निवीदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावीत.

७) ई-निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या पोर्टलवर जमा करण्यात यावी.

८) तांत्रिक निविदा शक्यतो दि.१०/६/२०२४ रोजी अथवा तदनंतर उघडण्यात येतील.

सदर ई-निविदा ही मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानने दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.८७०७/२०२३ मधील आदेशास अधिन राहून मागविण्यात येत आहेत.

कोणतीही अथवा सर्व ई-निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणे बाबतची निविदा.

( एका वर्षा करीता )

### निविदाधारकाची माहिती

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| ०१ | निविदाधारकाचे नांव | |
| ०२ | पत्रव्यहाराचा संपूर्ण पत्ता | |
| ०३ | दूरध्वनी क्रमांक | |
| ०४ | ऑफिस | |
| ०५ | फॅक्स नंबर | |
| ०६ | मोबाईल नंबर | |
| ०७ | ई.मेल आय डी | |
| ०८ | संपर्कासाठी अधिकृत प्रतिनिधीचे नांव | |
| ०९ | फोन नंबर / मोबाईल नंबर | |
| १० | मालकाचे / भागीदारांची नांवे | |
| ११ | ठेकेदारीचा नोंदणी क्र.<br>(शॉप ॲक्ट / कंपनी ॲक्ट प्रमाणे) | |
| १२ | औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर | |
| १३ | सध्याचे लेबर लायसेन्स नंबर | |
| १४ | प्रॉव्हींडंड फंड कोड अकांऊंट नंबर | |
| १५ | ई.एस.आय.सी. कोड नंबर | |
| १६ | व्यवसाय कर नोंदणी नंबर | |
| १७ | कर्मचाऱ्यांची एकुण संख्या | |

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १८ | आयकर पॅन नंबर | |
| १९ | सेंट्रल GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| २० | स्टेट GST रजिस्ट्रेशन नंबर | |
| २१ | बँकेचे नाव, शाखा<br>बँक खाते नंबर | |
| २२ | आय.एफ.सी कोड | |
| २३ | आर्थिक वर्ष सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ चे बॅलन्सशीट. | |
| २४ | वार्षिक उलाढाल २०२०-२१,२०२१-२२, २०२२-२३ चार्टर्ड अकौंट सर्टिफिकेट | |
| २५ | २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ चे आयकर रिटर्न दाखल केले संबंधीचे पुरावे. | |

**निविधाधारकाची स्वाक्षरी व शिक्का**

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबत
## ई – निविदेच्या शर्ती व अटी

१) कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व इतर कर्मचारी पुरविणेबाबतची निविदा www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन भरावयाची असून, **ऑनलाईन भरलेल्या Technical Bid व Commercial Bid हयाच ग्राहय धरण्यात येईल.**

२) निविदा ऑनलाईन भरावयाची असल्याने Technical Bid सर्व कागदपत्रे (अनुक्रमणिकेनूसार पान नंबरसह) स्कॅन करुन ऑनलाईनच अपलोड करावीत.

३) Technical Bid चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

४) **निविदा पूर्व अर्हता:-**

पुढील प्रमाणे अर्हता धारण करणा-या निविदा धारकांनाच प्रस्तुत निविदेसाठी पात्र समजण्यात येईल.

अ) मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना प्रतीवर्षी सरासरी किमान १००० कामगार पुरविण्याचा अनुभव असावा.

ब) मागील ३ वर्षात कोणतेही एका आस्थापनेला दररोज ५०० कामगार पुरविणेचा कमीत कमी १ कार्यादेश असावा.

क) मागील ३ वर्षात (सन- २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३) आर्थिक वर्षांतील सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.१० कोटी इतकी असावी.

५) **निविदेचे मुल्यांकन:-**

**अ) तांत्रीक मुल्यांकन** – प्राप्त निविदा धारकांच्या पुढील मुल्यांकन पध्दतीप्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

**(१) मागील ३ वर्षात प्रतिवर्षी सरासरी पुरविलेल्या कामगारांची संख्या:-**

| अ.नं. | कामगार संख्या | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १००० ते १२०० | १० |
| २ | १२०० ते १५०० | २० |
| ३ | १५०० ते २००० | ३० |
| ४ | २००० पेक्षा जास्त | ४० |

**(२) मागील ३ वर्षात ५०० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी वेगवेगळ्या आस्थापनेला पुरविलेल्या कार्यादेशांची संख्या:–**

| अ.नं. | आस्थापनेवरील कार्यादेशांची संख्या | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | १ अथवा १ पेक्षा जास्त ३ पर्यंत | २० |
| २ | ३ पेक्षा अधिक | ३० |

**(३) मागील ३ वर्षातील वार्षिक सरासरी उलाढाल:-**

| अ.नं. | वार्षिक उलाढाल | गुण (मार्क्स) |
|---|---|---|
| १ | रु.१० ते १२ कोटी | १० |
| २ | रु.१२ कोटी पेक्षा जास्त ते १५ कोटी | २० |
| ३ | रु.१५ कोटी पेक्षा जास्त | ३० |

उपरोक्तप्रमाणे तांत्रिक निविदेमध्ये नमूद मुल्यांकन पध्दतीप्रमाणे किमान ७० गुण मिळालेल्या निविदा धारकांच्याच वाणिज्यीक निविदा उघडण्याला पात्र असतील.

ब) **वाणिज्यिक मुल्यांकन:-** तांत्रिक मुल्यांकनात किमान ७० गुण मिळालेल्या निविदा धारकांची वाणिज्यीक निविदा उघडण्यात येवून त्यामध्ये न्युनतम दरधारक निविदाधारकास यशस्वी निविदा धारक समजण्यात येईल.

**- ज्या निविदाधारकाची ई-निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात येईल त्यांना या अटी-शर्तीमध्ये '' कंत्राटदार '' असे संबोधण्यात येत आहे.**

६) कंत्राटदार व त्यांचेमार्फत नेमू इच्छिणारे कंत्राटी कामगार हे भाविक प्रवृत्तीचे असले पाहीजेत. तसेच संस्थानमध्ये दर्शनासाठी येणा-या भाविकांशी नम्रतेने व तत्परतेने सेवा देणारे असावेत. भाविकांशी उध्दट, बेशिस्त वर्तन तसेच इतर गैरशिस्तवर्तन करणारे कंत्राटी कामगारांना तात्काळ विनानोटीस व विना नुकसान भरपाई कामावरुन बंद करणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील.

७) कंत्राटदाराने त्यांचेमार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांवर नियंत्रण (कंन्ट्रोल) व देखरेख (सुपरविझन) ठेवणेची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार व संस्थान यांचेमध्ये मालक व नोकर असा कोणताही संबध राहणार नाही अथवा प्रस्थापित होणार नाही. त्याबाबत काही विवाद निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची/ठेकेदाराची राहील.

८) कंत्राटदार अथवा त्याने पुरविलेले कंत्राटी कामगार यांनी संस्थानच्या आवारात कोणतेही स्वरुपाचे गैरवर्तन केले अथवा शिस्तीस बाधा येईल असे कोणतेही वर्तन केल्यास, असे गैरवर्तन केलेले कामगार कंत्राटदाराने संस्थानला पुरवू नये. तसेच असे प्रकार वारंवार घडल्यास विना नुकसान भरपाई व विना नोटीस संबंधीत कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासन राखून ठेवत आहे.

९) कंत्राटदारामार्फत पुरविलेले कंत्राटी कामगारांनी कोणतेही गैरकृत्य केल्यास किंवा संस्थानचे मिळकतीस इजा/हानी पोहोचविल्यास त्याबाबतची संपूर्ण नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांचेवर राहील.

१०) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांची निवासाची व्यवस्था संबधीत कंत्राटदारास स्वत: करावी लागेल. कंत्राटी कामगारांची निवासव्यवस्था करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

११) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे ''**कुशल कामगार**'' म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो, असा कामगार. ''**अकुशल कामगार**' म्हणजे'' ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही परंतु, तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तूंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

१२) संस्थानला आवश्यकतेप्रमाणे व गरजेप्रमाणे पुरेसे संख्येने अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे संबंधीत निविदाधारकावर बंधनकारक आहे. प्रशासनाचे आवश्यकतेनुसार श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री दसरा उत्सव, शिर्डी महोत्सव, आपत्ती काळात व सुट्ट्यांचे कालावधीत तात्पुरते जादा कंत्राटी कामगारांची मागणी केल्यास ते पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. निविदाधारकाने वर्क ऑर्डरप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे संस्थान प्रशासनाला कंत्राटी कर्मचारी पुरेसे संख्येने न पुरविल्यास, कमी पुरविलेल्या कर्मचारी संख्येच्या प्रमाणात रूपये ९००/- प्रतिदिन प्रती कर्मचारी याप्रमाणे दंड कंत्राटी कामाचे बिलातून वसूल/कपात करणेत येईल.

१३) कंत्राटदाराने निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी त्यांचेमार्फत पुरविलेल्या अकुशल, कुशल कामगारांची संपूर्ण नावे, पत्ते व त्यांचे जन्मतारीख दाखले, दोन पासपोर्ट साईज फोटो संस्थानला देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सर्व कंत्राटी कामगारांचा **पोलीस तपासणी अहवाल** कार्यादेश मिळालेपासून ६० दिवसांचे आत संस्थानला सादर न केल्यास दरमहा रूपये १०,०००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात/वसूल करणेत येईल.

१४) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविणेत येणारे कंत्राटी कामगारांना कार्यारंभ आदेश मिळालेपासून ०२ महिन्याचे आत कंपनीने उत्तम दर्जाचे प्रशिक्षक नेमून त्यांचेमार्फत कंत्राटी कर्मचा-यांना प्रशिक्षण वर्ग (**Training**) द्यावे लागेल. तसे न केल्यास प्रतिदिनी रु.१,०००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात / वसूल करणेत येईल.

१५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन परिपत्रकानुसार विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, २६४, पहिला मजला, कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ या कार्यालयाकडे कंत्राटी कामगारांचा विमा उतरविणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील.

१६) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगारांना विनामूल्य गणवेश, ओळखपत्र, डयुटी कार्ड कार्यारंभ आदेश मिळालेपासून १ महिन्याचे आत पुरविणेची जबाबदारी संबधीत कंत्राटदारावर राहील व त्याकामी येणारा खर्च कंत्राटदारास स्वत: करावा लागेल. तसे न केल्यास प्रतिमाह प्रतिकर्मचारी रूपये १०००/- दंड कंत्राटदार यांचे मासिक बिलातून कपात/वसूल करणेत येईल.

१७) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून युनिफॉर्म, ओळखपत्र, ड्युटी कार्डबाबत रक्कम कंत्राटदारास वसूल/कपात करता येणार नाही.

१८) कंत्राटदार व त्यांचेमार्फत पुरविण्यात येणारे कंत्राटी कामगार यांच्यात काही विवाद अथवा तंटा उपस्थित झाल्यास तो सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याची तोषीस अथवा झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही याची खबरदारी घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१९) मा.व्यवस्थापन/तदर्थ समितीचे सभेमध्ये निश्चीत केलेल्या वेतन व इतर दरामध्ये कोणत्याही सबबीवर कंत्राटदारास अथवा त्याने पुरविलेल्या कंत्राटी कामगारास दरवाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. वेतन दराबाबत अथवा इतर कायदेशीर देणी देणेबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदार यांची राहील.

२०) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-यास कामगार नुकसान भरपाई (वर्कमन कॉम्पेनसेशन ॲक्ट, १९२३) कायद्यान्वये नुकसानभरपाई द्यावयाची झाल्यास त्याबाबत संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचप्रमाणे वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्टचे तरतुदीस अनुसरून कंत्राटी कामगारांची विमा पॉलीसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे व सदर विमा पॉलीसीची प्रमाणीत प्रत संस्थानकडे दाखल करणे संबंधीत एजन्सीवर बंधनकारक राहील. दरम्यानचे काळात कंत्राटी कर्मचारी यांचे संदर्भात काही दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी किंवा नुकसान भरपाईची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहिल. वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्टनूसार काढावयाची विमा पॉलीसी प्रिमीअम संदर्भात कुठलीही रक्कम कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणार नाही.

२१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१ अन्वये सर्व कंत्राटी कर्मचा-यांचा रु.१० लाख रकमेचा अपघात विमा पॉलीसी कार्यारंभ आदेश मिळताच तात्काळ घेणे, कार्यारंभ आदेश ते विमा पॉलिसी उतरविणे या दरम्यानचे कालावधीत कर्मचा-यांचा अपघात झाल्यास, त्यास नियमानुसार रू.१० लाख नुकसान भरपाई देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच कार्यादेश पारित झालेपासून ३० दिवसाच्या आत कर्मचारी यादीसह विमा पॉलीसीची प्रमाणित प्रत संस्थानकडे सादर न केल्यास कंत्राटदाराचे देयकातून रू.१० लाख कपात करणेत येईल.

२२) एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड ॲन्ड मिसलिनियस प्रोव्हीजन ॲक्ट, १९५२ नुसार कंत्राटदाराकडे भविष्यनिर्वाह निधीचा महाराष्ट्रातील रिजनल प्रॉव्हीडंट फंड कमिशनर ऑफिस, अथवा नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्रॉव्हीडंट फंड कोड नंबर असणे आवश्यक आहे. भविष्य निर्वाहनिधीचा स्वतंत्र कोड नंबर संबंधीत ॲथॉरिटीकडून घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या निविदाधारकाची निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदेसोबत प्रॉव्हिडंट फंड कोड ड्राफ्ट नंबरची प्रत सादर करणेत यावी. तसेच कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ नुसार कंत्राटदाराकडे ईएसआयसी चा महाराष्ट्रातील रिजनल ऑफिस, नाशिक उप विभाग, नाशिक यांचेकडील स्वतंत्र ईएसआयसी कोड नंबर संबंधीत ॲथॉरिटीकडून घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. ईएसआयसीचा स्वतंत्र कोड नंबर नसलेल्या निविदाधारकाची निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदेसोबत ईएसआयसी कोड नंबर सर्टिफिकेटची प्रत सादर करणेत यावी.

२३) कंत्राटी कर्मचारी हिस्सा प्राव्हींडंड फंड १२ % व मालकाचा हिस्सा १३ % (प्रशासकीय चार्जेससह) अशा एकूण २५% प्रा.फंडांच्या रकमेचा भरणा तसेच कर्मचारी राज्यविमा निगम (ESIC) कंत्राटी कर्मचारी हिस्सा ०.७५% व मालकाचा हिस्सा ३.२५% कंत्राटदाराने स्वतः करावायाचा आहे व त्याबाबतची चलने व इतर अनुषंगिक कागदपत्रे संस्थानच्या सामान्य प्रशासन विभागातील वशी १० अ कार्यासन यांचेकडे विहित मुदतीत जमा करावयाची आहे. त्यानंतरच सदर प्राव्हीडंड फंड १३% मालकाचा हिस्सा व ESIC ३.२५% मालकाचा हिस्सा कंत्राटदारास/मासिक बिलामध्ये संस्थानकडून अदा करण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रॉव्हीडंट फंड व ESIC रक्कमेचा भरणा विहीत मुदतीत करणे व प्रॉव्हीडंट फंड चलने, इतर अनुषंगीक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर करणे हे कंत्राटदारावर नियमानुसार बंधनकारक राहील. त्याची तोषीस/झळ संस्थानला लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विलंबाबाबत दंडात्मक अथवा इतर कारवाई झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२४) मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ चे कलम ६ (ब) ब नुसार प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे माहे जून व माहे डिसेंबर या महिन्याचे कंत्राटी कामगारांचे पगार पत्रकातुन सर्व कंत्राटी कामगारांची नियमानुसार विहित दराने वेलफेअर फंडाची वर्गणी (कामगार हिस्सा) कपात करुन, तसेच मालकाच्या हिश्याची वेलफेअर फंडाची वर्गणी कंत्राटदाराने स्वत: जमा करावयाची आहे व अशा कामगार तसेच मालक वर्गणीच्या एकत्रीत रक्कमेचा भरणा प्रत्येक कॅलेंडर वर्षाचे १५ जुलै व १५ जानेवारी पुर्वी चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेणू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई- ४०० ०१३ यांचेकडे विहित विवरणत्रासोबत कंत्राटदाराने करावयाचा आहे. सदर कामगार कल्याण निधी भरणा करणेची कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कल्याण निधी वर्गणी संदर्भात कुठलीही रक्कम कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणार नाही.

२५) कंत्राटदाराने महीना भरल्यानंतर पुढील महिन्यांच्या तीन तारखेपर्यंत त्यांचे कामाचे बिल हजेरीपटासह संस्थानचे संबधीत अधिक्षक/खातेप्रमुख यांचेमार्फत कामगार विभागाकडून तपासून/पडताळणी करून लेखाशाखेकडे दाखल करणे आवश्यक आहे.

२६) लेखाशाखेकडून बिलाची रितसर तपासणी/पडताळणी केल्यानंतर बिलाची मंजूर रक्कम कंत्राटदारास आदा केली जाईल.

२७) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे वेतन महिना पूर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेचे आंत विहीत वेळेत संबंधित कंत्राटी कर्मचा-यांचे बॅंक अकाऊंटमध्ये वर्ग करणे कंत्राटदारावर नियमाप्रमाणे बंधनकारक राहील. संस्थानकडून काही कारणास्तव बिलाची रक्कम ठेकेदारास आदा करणेस विलंब झाल्यासही देखील कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचे पेमेंट वाटप स्व:भांडवलातून विहीत मुदतीत म्हणजे महिना पूर्ण झालेनंतर पुढील महिन्याचे १० तारखेपर्यंत न केल्यास, ११ तारखेपासून ते पेमेंट वाटप होईपर्यंत प्रत्येक दिवसाला रूपये ५,०००/- याप्रमाणे दंड कंत्राटदाराचे मासीक बिलातुन वसूल/कपात करणेत येईल.

२८) कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांचे हजेरीपत्रक, पगारपत्रक व इतर आवश्यक ते रेकार्ड कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टप्रमाणे ठेकेदारास विहीत नमुन्यात ठेवावे लागेल. ते कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कंत्राटी कामगारांचे वेतनाबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२९) **अ)** कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी कामगारांचे, कामगार कल्याण निधी, व्यवसायकर, आयकर, टी.डी.एस., इन्क्रीमेंट, वर्कमेन कॉम्पेनसेशन, घरभाडे भत्ता, पगारी सुट्टया, पगारी रजा, ई.एस.आय.सी. कॉन्ट्रीब्युशन, उपदान (ग्रॅच्युइटी), जी.एस.टी कर व इतर आर्थिक तसेच अपघाती जीवीत बाबी इ. संबंधीची सर्व कायदेशीर जबाबदारी औद्योगिक व कामगार कायदयाचे तरतुदीनुसार कंत्राटदारावर राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थान प्रशासनाला लागणार नाही हे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

**ब)** वरील सर्व कायदेशीर जबाबदारी गृहीत धरुन, कंत्राटदाराने व्यावसायिक निविदेमध्ये (Commercial Bid मध्ये) सेवा दर (Service Charges) संस्थानकडून देण्यात येणा-या वेतन दरावर नमूद करावयाचे आहेत.

**क)** कंत्राटदारामार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाचे शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०२ (मुंबई, सिकंदराबाद, बैगलोर व चेन्नई कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे अनुज्ञेय असणारे किमान वेतनदर तसेच मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेले निर्णयानूसार सध्या देय्य असलेले वेतनदर (महाराष्ट्र शासनाकडुन वेळोवेळी देय्य होणारे स्पेशल अलौंन्ससह) अधिक प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा- १३.००%) अधिक कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतनदराचे रक्कमेवर सर्व्हिस चार्जेस रक्कम अधिक संपुर्ण बिलाचे रक्कमेवर अनुज्ञेय GST अधिक सानुग्रह अनुदान - ८.३३% (प्रत्येक वर्षी दिपावली सणाचे वेळी), अधिक मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७, निर्णय क्र.१४१ नूसार कंत्राटी कर्मचा-यांचा १० लाख पर्यंतचा अपघात विमा प्रिमीअम रक्कम, ESIC-३.२५% याप्रमाणे रक्कम संबंधीत ठेकेदारास संस्थानकडुन देणेत येईल. याव्यतिरिक्त कोणतीही रक्कम संस्थानकडुन कंत्राटदारास आदा केली जाणार नाही व तशी रक्कम मागणी करणेचा कंत्राटदारास अधिकार राहणार नाही. इतर सर्व प्रकारची आर्थिक देणी देणेची जबाबदारी सबंधीत कंत्राटदारावर राहील. त्याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३०) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी कामगारांसबंधी कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम १९७१, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, किमान वेतन अधिनियम १९४८ व इतर सर्व औद्योगिक तसेच कामगार कायदयांच्या तरतुदींचे पालन करण्याची व त्यानुसार विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया आवश्यक ते सर्व रेकॉर्ड, दस्तऐवज ठेवण्याची व संबधीत ॲथॉरिटीला विवरणपत्रे पाठविण्याची, त्याबाबत वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३१) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणा-या कंत्राटी कामगारांचे संदर्भात ठेवावयाचे सर्व प्रकारचे रेकॉर्ड्स, दस्तऐवज उदा. कंत्राटी कामगारांची प्रत्येक महिन्यांची बिले, हजेरी रजिस्टर, पगारपत्रके, यादया, विवरणपत्रे, प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हिस टॅक्स, कामगार कल्याण निधी इत्यादि संदर्भातील सर्व कागदपत्रे व दस्तऐवज विहीत नमुन्यात कायदेशीर दृष्टया अचुक व परिपुर्ण ठेवण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

३२) कंत्राटदाराकडून संस्थानला पुरविण्यात येणारे कामगारांचे दैनंदिन आगमन व निर्गमनावर नियंत्रण ठेवण्यासाठी संस्थानची फेस पंचीग सॉफ्टवेअरमध्ये कर्मचा-यांची नोंदणी करून बीलासोबत रिपोर्ट सादर करावे लागेल. तसेच संबधीत कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा पेमेंट स्लिप द्यावी लागेल. हे संबधीत कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसे न केल्यास प्रति कर्मचारी रुपये १,०००/- दंड मासिक बिलातून कपात / वसूल करणेत येईल.

३३) संबंधित कामाची निविदा शुल्क (विना परतावा) रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) व बयाणा रक्कम म्हणून रु.४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र) www.mahatenders.gov.in या ऑनलाईन टेंडर पोर्टल वरील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे भरावी.

३४) निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा करतेवेळी कंत्राटदारास कामाची हमी म्हणून एकूण अंदाजित वार्षिक बिलाच्या रकमेचा ३% सुरक्षा अनामत रक्कम संस्थानकडे बिनव्याजी जमा करावी लागेल. कंत्राटदाराने समाधानकारक काम करून कंत्राट पूर्ण केलेनंतर सदर रक्कम कंत्राटदारास बिनव्याजी परत करणेत येईल. सन २०२३-२४ चे सदर कामाचे वार्षिक बील अंदाजे रु.४० कोटी इतके होते. सन २०२४-२५ करीता अंदाजित खर्च रु.४५ कोटी.

३५) निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आंत सदर कंत्राटदाराने रितसर लेखी करारनामा रु.१००० चे स्टॅम्प पेपरवर करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व कायद्यानुसार आवश्यक असलेले रजिस्ट्रेशन, प्रॉव्हीडंट फंड नंबर, लेबर लायसेन्स, सुरक्षा अनामत रक्कम इत्यादी सर्व बाबींची कायदेशीर पुर्तता कंत्राटदारास ०१ महिन्याचे आत करावी लागेल. सदर पुर्तता विहीत मुदतीत न केल्यास त्या पुढील तारखेपासून प्रतिदिनी रु.२,०००/- मात्र दंडाची रक्कम ठेकेदाराचे मागील बिलातुन कपात / वसुल करणेत येईल.

३६) निविदा मंजूर झालेनंतर कार्यादेश प्राप्त होताच वर नमूद केलेप्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारनामा सांक्षाकित करुन देणे कंत्राटदारास बंधनकारक राहील तसेच या निविदेतील अटी व शर्ती, मा.व्यवस्थापन समिती ठराव, कार्यादेश इत्यादि करारनाम्याचा एक भाग समजला जाईल.

३७) संस्थानला सदर कंत्राटदाराची आवश्यकता न वाटल्यास अथवा कंत्राटदाराचे काम समाधानकारक न वाटल्यास सदरचा करार अथवा कंत्राट मुदतपुर्व विना नोटीस व विना नुकसान भरपाई रद्द करण्याचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

३८) निविदेतील कोणत्याही अटी व शर्तींचा भंग झाल्यास अथवा कंत्राटदाराने काम करण्याचे नाकारल्यास कंत्राटदाराची बयाणा रककम तसेच अनामत रक्कम जप्त करणेत येईल व विनानोटीस किंवा विना नुकसान भरपाई कंत्राट रद्द करणेत येईल. त्याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच संबंधित कंत्राटदारास ०३ वर्षासाठी Black list केले जाईल.

३९) परिशिष्ट – ३ मध्ये नमूद केलेप्रमाणे तांत्रिक कागदपत्रांना अनुक्रमणिकेनूसार पृष्टांकन करुन अपलोड करावीत.

४०) सदरचे कंत्राट हे कार्यारंभ दिल्याचे तारखेपासून पुढील १२ महिने कालावधीसाठी वैध राहील व तदनंतर पुढील ई निविदा प्रक्रिया पूर्ण होवून अंतीम होईपर्यंत आहे त्याच अटी शर्ती तसेच दरपत्रकानूसार कामकाज करणे क्रमप्राप्त राहिल. मुदतवाढीबाबत कंत्राटदारास लेखी पत्रान्वये कळविणेत येईल अथवा सदर करारनामा/कॉन्ट्रॅक्ट मूदत संपताच आपोआप संपुष्टात येईल.

४१) कोणतीही निविदा स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

४२) निविदाधारकाने ई-निविदा भरतांना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास /राहील्यास त्या निविदा कोणतेही कारण न देता रद्द अथवा अपात्र समजण्यात येतील. त्याबाबत संस्थान प्रशासनाचा निर्णय अंतिम समजणेत येईल.

४३) भविष्याची तरतूद म्हणून ई-निविदेमध्ये पुरविणेत येणा-या कामगारांचे संख्येत वाढ किंवा घट करण्याचा संस्थानचा अधिकार राहील व त्यानुसार कंत्राटदाराला कामगार पुरवावे लागतील. पुरविलेल्या कामगारांचे मासीक बिलानुसार सेवाआकार देण्यात येईल.

४४) सदर ई-निविदा ही मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानने दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.८७०७/२०२३ मध्ये दि.९.५.२०२४ रोजीचे आदेशास अधिन राहून मागविण्यात येत असून ई-निविदेमध्ये पुरविणेत येणा-या कामगारांचे संख्येत घट करण्याचा संस्थानचा अधिकार राहील व त्यानुसार कंत्राटदाराला कामगार पुरवावे लागतील. पुरविलेल्या कामगारांचे मासीक बिलानुसार सेवाआकार देण्यात येईल.

४५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सदर निविदेत दोनपेक्षा जास्त न्युनतम दर धारक L-1 आल्यास ज्या निविदाधारकाचे तांत्रिक मुल्यांकनात सर्वाधिक गुण असेल अशा निविदाधारकास कार्यादेश देण्यात येईल. तांत्रीक मुल्यांकनात सारखे गुण असल्यास मागील ०३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल व कामाचा अनुभव हे निकष विचारात घेऊन जास्तीची उलाढाल व अनुभव असलेल्या निविदाधारकांचा विचार करता येईल, किंवा न्युन्तम निविदाधारकांमध्ये काम विभागून देणेबाबतची व्यवहार्यता तपासून त्यानुसार निर्णय घेणेबाबतचा अधिकार संस्थानला राहील.

४६) ऑनलाईन निविदा सादर करतांना व्यावसायिक निविदेमध्ये ( Financial Bid ) तक्त्यामध्ये वेतनदर, प्राव्हीडंन्ड फंड, सानुग्रह अनुदान, सेवा कर अथवा जी एस टी तसेच ग्रुप इन्शुरन्स इत्यादी बाबी वगळून निवीदा फॉर्ममधील अटी शर्तीचे अ.नं.२९ (अ) मध्ये नमूद केलेल्या कंत्राटदारावरील सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी फायनान्सशियल बीडमध्ये सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी. ऑन-लाईन भरलेली व्यावसायीक बोली (Commercial Bid) ग्राहय धरण्यात येईल. (याबाबतचा तपशील पृष्ठ क्र.२१ वर आहे.)

४७) निविदेत नमूद केलेले काम गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येणार आहे. त्यासाठी निविदाधारकांनी पान क्र.०२.०३, १६ व १७ मध्ये दर्शविलेली कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

४८) या कॉन्ट्रॅक्टबाबत काही वाद अथवा तंटा उत्पन्न झाल्यास तो मा.अतिरिक्त जिल्हा न्यायालय, राहाता/मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

४९) निविदेमधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करुन निविदा सादर करावी व निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमूद केलेल्या अटीशर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सही शिक्यानिशी करुन अपलोड करणेत यावे.

५०) उपरोक्त अटी व शर्तीमध्ये उल्लेख नसलेल्या इतर बाबींतील सर्व हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# परिशिष्ट – १

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा – अहमदनगर पिन- ४२३ १०९

## मनुष्यबळ संख्या तपशिल

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कंत्राटी पध्दतीने स्वच्छता, बगीचा व इतर कामासाठी अकुशल कामगार, कुशल कर्मचारी पुरविणेबाबत सर्व साधारण माहिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना स्वच्छता, बगीचा व इतर कामासाठी कंत्राटी पध्दतीने अकुशल व कुशल कर्मचारी पुरविण्यासाठी अनुभवी, नोंदणीकृत व परवानाधारक कंत्राटदारांकडून ई – निविदेव्दारे निविदा मागविण्यात येत आहेत. संस्थानला दैनंदिन कामासाठी कंत्राटीपध्दतीने खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांमार्फत आवश्यकतेप्रमाणे पुरवावयाचे आहेत.

**अ) कुशल कामगार:- ५६३**

**** वर्गवारी ****

| अ. नं. | कुशल वर्गवारी | संख्या |
|---|---|---|
| १ | मेन्टेनन्स इंजि. | १ |
| २ | आर ए सी मेकॅनिक | ५ |
| ३ | सोलर ऑपरेटर | २ |
| ४ | मुकादम | २ |
| ५ | तारतंत्री | १७ |
| ६ | आचारी | ४ |
| ७ | लिपीक | १५५ |
| ८ | कंत्राटी सल्लागार | १ |
| ९ | सिव्हिल सुपरवायझर | १ |
| १० | गवंडी | २ |
| ११ | सुतार | २ |
| १२ | निदेशक | १ |
| १३ | सहा.शिक्षक | ७ |
| १४ | प्रयोगशाळा सहा. | २ |
| १५ | सॉफ्टवेअर प्रोग्रा. | १ |
| १६ | वेबसाईट ऑपरेटर | १ |
| १७ | तांत्रीक सहा.हार्डवेअर | २ |
| १८ | टर्नर | २ |
| १९ | टेलि. ऑपरेटर | ३ |
| २० | शिक्षक | ३२ |
| २१ | वाहन चालक | ४७ |
| २२ | ॲटो इलेक्ट्रीशियन | १ |

| अ. नं. | कुशल वर्गवारी | संख्या |
|---|---|---|
| २३ | मेकॅनिक | २ |
| २४ | सहा.पुजारी | ७ |
| २५ | परिचारीका | १९६ |
| २६ | फिजिओथेरपीस्ट | ३ |
| २७ | लॅब टेक्नीशियन | १२ |
| २८ | फार्मासिस्ट | ८ |
| २९ | ज्यु.एक्स-रे टेक्नीशियन | ४ |
| ३० | लॅब असिस्टंट | ७ |
| ३१ | बायोमेडीकल टेक्नीशियन | ५ |
| ३२ | सी.एस.एस.डी. टेक्नीशियन | १ |
| ३३ | डायलेसिस टेक्नीशियन | ३ |
| ३४ | एमआरआय टेक्नीशियन | १ |
| ३५ | ईसीजी टेक्नीशियन | २ |
| ३६ | टेलर | २ |
| ३७ | परफ्युजिनिस्ट | २ |
| ३८ | बीएएमएस आरएमओ | ६ |
| ३९ | सिनिअर ओटी टेक्नीशियन | ६ |
| ४० | ज्युनिअर कॅथलॅब टेक्नीशियन | २ |
| ४१ | ऑडीओलॉजिस्ट | १ |
| ४२ | ओटी सहाय्यक | २ |
| | **एकूण-** | **५६३** |
| | | |

**ब)** स्वच्छता कामासाठी अंदाजे **अकुशल कामगार** :- ६८

**क)** बगीचा, मालवाहतुक, मालभरणे, खाली करणे व इतर कामासाठी **अकुशल कामगार :- ६१९**

**ड) अंदाजे एकुण - (अ + ब + क)** (५६३ + ६८ + ६१९ ) :- १२५०

आवश्यकतेनुसार उपरोक्त संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे कंत्राटदारास कंत्राटी कामगार पुरवावे लागतील.

१) ई-निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख - ०८/०६/२०२४ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर आलेली ई-निविदा स्वीकारली जाणार नाही.

२) अपूर्ण अथवा बयाणा रक्कम नसलेली, तसेच आवश्यक कागदपत्रे जोडली नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

३) उपरोक्त अटी शर्तीमध्ये अंशत: किंवा पुर्णत: बदल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

## परिशिष्ट – २

## अकुशल व कुशल कर्मचा-यांकरीता सर्वसाधारण आवश्यक शैक्षणिक पात्रता

| अ.नं | पदनाम | सर्वसाधारण आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| ०१ | सहाय्यक अभियंता यांत्रिकी | 1) Degree / Diploma in Mechanical Engineering from any Government recognized University / Board; |
| ०२ | ए सी व रेफ्रीजरेशन मेकॅनिक | 1) I.T.I. Refrigeration and A/C with NCTVT; |
| ०३ | सोलर प्लॅन्ट ऑपरेटर (कुकींग) | 1) Certificate course in Solar Plant Operator from any Government recognized Institute / Board. |
| ०४ | तारतंत्री / विजतंत्री | 1) I.T.I. Wireman with NCTVT;<br>2)Electrical Wireman License must; |
| ०५ | स्वच्छता मुकादम | 1) Secondary School Certificate Examination passed ; |
| ०६ | आचारी | 1) Secondary School Certificate Examination passed.<br>2) ITI Craftsman in food produtions Course passed. |
| ०७ | वाहन चालक | 1) Higher Secondary Certificate Examination passed;<br>2) Heavy Duty Motor Driving Licence must with Bus batch.<br>3) Fitness as per provisions of M.V. Act 1949; |
| ०८ | ॲटो इलेक्ट्रिशियन | 1) I.T.I.Motor Mechanic and NCTVT with additional qualification of Auto Electrician Course Passed from Government recognized board / Institute. |
| ०९ | मोटार मेकॅनिक | 1) I.T.I. Motor Mechanic and NCTVT **OR** Diploma in Automobile from Government recognized University ; |
| १० | मोजणीदार | 1) Higher Secondary Certificate Examination passed.<br>2) Basic Certificate Surveyor course from any government recognized Institute;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; **OR**<br>1) Experience of 5 years as a Surveyor in Maharastra Government Land Records Office. |
| ११ | मालमत्ता सल्लागार | 1) Graduate from any Government recognized University ;<br>2) Experience of 5 years as a Naib-Tahsildar in Govt. of Maharastra Revenue Department. |
| १२ | कनिष्ठ अभियंता | 1) B.E. Civil / DCE from any Government recognized university;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course; |
| १३ | सुतार | 1) Secondary School Certificate Examination passed;<br>2) I.T.I.Carpenter. |
| १४ | गवंडी | 1) Secondary School Certificate Examination passed ;<br>2) I.T.I. Mason. |

| | | |
|---|---|---|
| १५ | सहाय्यक पुजारी | 1) Higher Secondary School Certificate Examination passed;<br>2) Three years course in Ved Shastra from reputed Institution with 3 years Experience. |
| १६ | निदेशक (कोपा) | 1) As per State Government Vocational Education and Training Department |
| १७ | सहाय्यक शिक्षक | 1) As per State Government School Code Rules |
| १८ | शिक्षक | 1) As per State Government School Code Rules |
| १९ | प्रयोगशाळा सहाय्यक | 1) Higher Secondary Certificate Science Examination passed.<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course; |
| २० | सॉफ्टवेअर प्रोग्रामर | 1) B.E. Electronics / IT / Computer / MCM / MCS and Microsoft / Java / Oracle International level certification; |
| २१ | तांत्रिक सहाय्यक हार्डवेअर | 1) 3 years – DETE (B.T.E. recognized) BCS / B.Sc. (Electronics) with A+ certification; |
| २२ | वेबसाईट ऑपरेटर | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Government Commercial certificate of Typing with English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed; |
| २३ | टेलिफोन ऑपरेटर | 1) Higher Secondary Certificate Examination passed.<br>2) Certificate course of Telephone Operator (minimum 6 months) from well known registered Institute;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course;<br>4) Government Commercial certificate of Typing English 40 w.p.m. and Marathi 30 w.p.m. speed; |
| २४ | टर्नर | 1) I.T.I. Turner with NCTVT; |
| २५ | प्लंबर | 1) Secondary School Certificate Examination Passed<br>2) ITI Plumber. |
| २६ | लिपीक | 1) Graduate from any Government recognized University ;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Government Commercial certificate of Typing – English 40 w.p.m. and Marathi 30 w.p.m. speed. |
| २७ | Staff Nurse<br>परिचारीका | 1) B.Sc. Nursing / R.G.N.M / G.N.M registered with the Indian Nursing Council/Maharashtra Nursing Council<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| २८ | Jr. Physiotherapists<br>कनिष्ठ भौतीक उपचार तज्ञ | 1) Bachelor of Physiotherapy (BPTh).<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |

| | | |
|---|---|---|
| २९ | Perfusionists<br>संजीवन शास्त्रज्ञ | 1) BPMT /B.Sc. with Diploma Course in Perfusion Technology from any Government recognized University.<br>2)MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३० | Pharmacists<br>औषध निर्माता | 1) Degree /Diploma in Pharmacy of Statutory University.<br>2) Registered under the Pharmacy Act 1948.<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३१ | Dialysis Technicians<br>रक्तशुध्दीकरण तंत्रज्ञ | 1) BPMT (Dialysis Technician).<br>OR<br>2) B.Sc. with Physics, Chemistry or Biology with DMLT from one of the Medical College or from any Institution Recognized by the University.<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३२ | Sr. MRI Technicians<br>वरिष्ठ एम.आर.आय. तंत्रज्ञ | 1) BPMT (X-Ray Technician) OR B.Sc. with Physics, Chemistry or Biology with Diploma in Radiology/ X-ray from recognised university<br>2) Preference will be given to candidates who possess the degree in Physics.<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३३ | ECG Technicians<br>विद्युत हृदय स्पंद आलेख तंत्रज्ञ | 1) BPMT (E.C.G.Technician).<br>OR<br>2) B.Sc.with Physics or Chemistry or Biology with Diploma in ECG from Govt. Recognized Institute.<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३४ | Bio-medical Technicians<br>जीव वैद्यकीय तंत्रज्ञ | 1) I.T.I. Electronics / Electrician and NCTVT;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३५ | CSSD Technicians<br>मध्यवर्ती निर्जंतुकीकरण तंत्रज्ञ | 1) Higher Secondary Certificate Examination passed with Diploma in CSSD from any Government recognized University / Institute; |
| ३६ | Jr. O.T. Technicians<br>कनिष्ठ शस्त्रक्रियागार तंत्रज्ञ | 1) Higher Secondary Certificate Examination passed with Diploma in Operation Theatre from any recognized University |

| | | |
|---|---|---|
| ३७ | Junior X-Ray Technicians<br>कनिष्ठ क्ष-किरण तंत्रज्ञ | 1)BPMT (X-Ray Technician) OR B.Sc. with Physics or Chemistry or Biology with Diploma in Radiology / X-ray from recognised university; OR Higher Secondary School Certificate Exam with vocational Education in vocation of X-Ray Technician and Possess 5 year experience of X-Ray Asst. or Dark-room Asst. in Govt. / Semi Govt. Hospitals.<br>2) Preference will be given to candidates who possess the degree in Physics.<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३८ | Sr. Lab Technicians<br>वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 1) BPMT (Laboratory Technician) OR B.Sc. with Physics or Chemistry or Biology with DMLT from Govt. Recognized Institute / university.<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ३९ | Jr. Lab. Technicians<br>कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 1) BPMT (Laboratory Technician) or HSC In Science with DMLT from Govt recognised institute<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ४० | Lab. Assistant<br>प्रयोगशाळा सहाय्यक | 1) BPMT (Laboratory Technician) or HSC In Science with DMLT from Govt recognised institute<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course; |
| ४१ | RMO (BAMS)<br>वैद्यकीय अधिकारी | 1) BAMS from Govt recognised university<br>2) Registered with Maharashtra Council of Indian Medicine<br>3) Experience minimum 3 year |

# परिशिष्ट – ३

**तांत्रिक निविदा (Technical Bid) आवश्यक कागदपत्रे.**

**खालील तपशीलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्राची (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करुन Soft Copy सादर करावी. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही.**

I) मागील ३ वर्षात विविध आस्थापनांना आस्थापनानिहाय पुरविणेत आलेल्या कामगारांची संख्या दर्शविणारा खालीलप्रमाणे स्वसाक्षांकित तक्ताः-

**अ) आर्थिक वर्ष २०२०-२१** (दि.०१ एप्रिल २०२० ते दि.३१ मार्च २०२१)

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**ब) आर्थिक वर्ष २०२१-२२** (दि.०१ एप्रिल २०२१ ते दि.३१ मार्च २०२२)

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**क) आर्थिक वर्ष २०२२-२३** (दि.०१ एप्रिल २०२२ ते दि.३१ मार्च २०२३)

| अ.नं. | ज्या आस्थापनेला कामगार पुरविण्यात आले त्या आस्थापनेचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

ड) मागील ३ वर्षात सरासरी पुरविलेल्या कामगारांची संख्या

| अ.नं. | आर्थिक वर्ष | आस्थापनेचे नाव | पुरविण्यात आलेल्या कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | २०२०-२१ | | |
| २ | २०२१-२२ | | |
| ३ | २०२२-२३ | | |

**II) कागदपत्रे**

| अ.नं. | निविदेसोबत सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असलेबाबत सक्षम प्राधीका-याने दिलेले प्रमाणपत्र. |
| २ | निविदाधारकाचे मागील तीन वर्षाचे उलाढालीबाबत चार्टर्ड अकौन्टंट (CA) यांचे प्रमाणपत्र (२०२० ते २०२१, २०२१ ते २०२२ व २०२२ ते २०२३) |
| ३ | २०२० ते २०२१, २०२१ ते २०२२ व २०२२ ते २०२३ चे इन्कम टॅक्स रिटर्न. |
| ४ | आयकर पॅन कार्डची सत्यप्रत. |
| ५ | कामगार आयुक्त कार्यालयाकडील मागील ३ वर्षातील सर्व कामांचे लेबर लायसेन्सची वर्षनिहाय सत्यप्रती. |
| ६ | मागील तीन वर्षातील वर्कऑर्डर / करारनामे (कर्मचारी संख्येसह). |
| ७ | PF Code Accounts Number रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ८ | ESIC Code Accounts Number रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| ९ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत. |
| १० | GST रजिष्ट्रेशनची सत्यप्रत. |
| ११ | बँक अकौंन्ट खाते पास बुकची सत्यप्रत. |

सदर तांत्रिक निविदेत पात्र ठरणा-या निविदा धारकांचे मुल्यांकन पान नं.०४ वरील मुद्दा क्र. ५ प्रमाणे केले जाईल. निविदेसंबंधित अपलोड करण्यात येणारे कागदपत्रे (अनुक्रमणिका तयार करून पान नंबरींग करून) जोडावी.

**निविदाधारकाची सही व शिक्का**

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

## व्यावसायीक निविदा

दिनांक: - २२/०५/२०२४

प्रति,
**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.
ता.राहाता, जि.अहमदनगर

**विषय:- कंत्राटी पध्दतीने कुशल व अकुशल, स्वच्छता कर्मचारी व इतर कर्मचारी पुरविणेबाबतची ई- निविदा.**

संदर्भ:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील जाहिरात दैनिक ------------दि. २२/०५/२०२४
लोकसत्ता - मुंबई व पुणे
इंडियन एक्सप्रेस - दिल्ली

**महोदया,**

उपरोक्त संदर्भाधीन जाहिरातीस अनुसरुन व निविदाबाबतच्या अटी-शर्ती पुर्ण वाचून, समजून घेऊन मी खालील सही करणार पुढीलप्रमाणे ई-निविदा सादर करीत आहे.

**१) निविदाधारकाचे/ठेकेदाराचे** ----------------------------------------------------------------------

**संपूर्ण नांव व पत्ता** : ----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------

२) **फोन/मोबाईल नंबर** :

**ई-मेल** :

३) **कंत्राटदाराचे स्वरुप** :

(भागीदारी/प्रा.लि/पब्लीक लि.इ.)
भागीदारी असल्यास पार्टनरशीप डीड
ची प्रत, रजिस्ट्रेशन सर्टीफिकीट इ.
तांत्रिक निविदे सोबत जोडावी.

**४) सध्या एजन्सीकडे पे रोलवर असलेल्या कर्मचारी संख्येचा तपशील खालील प्रमाणे** :

अकुशल व कुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या :

५) सध्या कोणकोणत्या ठिकाणी लेबर व इतर
कामगार पुरवितात त्या संस्थेची
नांव, पत्ता, फोन नंबर सह यादी व संस्था निहाय कर्मचारी संख्येचा तपशिल
(सोबत नेमणूक पत्रांची सत्यप्रत व यादी जोडावी)

**६) कंत्राटी कामाचा पुर्वानुभव = एकुण वर्षे**

**७) निविदाधारकाची वार्षीक उलाढाल- रुपये**

**(सन २०२२ – २०२३ कालावधीतील)**

(निविदेसोबत चार्टर्ड अकौटंटचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी. त्याशिवाय निविदा विचारात घेतली जाणार नाही.)

८) **(अ) सध्याचे अकुशल कामगाराचे प्रतिदिनी वेतन दर (किमान वेतन दराप्रमाणे)**

| अ. नं. | तपशील | मुळवेतन | स्पेशल अलाऊन्स | एकूण किमान वेतन दर (प्रतिदिन) |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छता कामासाठी (किमान वेतनदराप्रमाणे) | ३६२.५० | ११८.०० | ४८०.५० |
| २ | बगीचा, मालवाहतुक, मालभरणे, खाली करणे | ३६२.५० | ११८.०० | ४८०.५० |
| ३ | इतर कामासाठी | ३६२.५० | ११८.०० | ४८०.५० |
| ४ | अकुशल कामासाठी (मुंबई कार्या.झोन नं.१) | ३८५.४२ | ११८.०० | ५०३.४२ |

**(ब) सध्याचे कुशल कामगारांचे प्रतिदिनी वेतन दर (किमान वेतनदराप्रमाणे)**

| अ.नं. | तपशील | मुळवेतन | स्पेशल अलाऊन्स | एकूण किमान वेतन दर (प्रतिदिन) |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामासाठी | ४२४.४६ | ११८.०० | ५४२.४६ |
| २ | कुशल कामासाठी (मुंबई कार्या.झोन नं.१) | ४४७.३८ | ११८.०० | ५६५.३८ |
| **दरमहा एकत्रित वेतनावरील कर्मचारी** | | | | |
| ३ | परफ्युजनिस्ट (पॅरामेडीकल कामासाठी) | - | - | ३२,७४३ |
| ४ | वैद्यकिय कामासाठी [ B.A.M.S.] | - | - | ३५,००० |

**टिप-** संस्थान आस्थापनेस शॉप्स ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लिसमेन्ट (झोन) परिमंडल नं.२ तसेच मुंबई व सिंकदराबाद, चेन्नई व बैंगलोर करीता परिमंडल नं.१ नुसार शासनाकडून वेळोवेळी जाहीर होणारे किमान वेतनदर लागु आहेत तसेच मा.व्यवस्थापन/तदर्थ समितीने वेळोवेळी वेतनाबाबत घेतलेले व होणारे निर्णयाप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यांना वेतन अदा करणे आपणांवर बंधनकारक राहील. वरील दरांमध्ये प्राव्हीडंन्ड फंड, जी.एस.टी, सानुग्रह अनुदान, ग्रुप इन्शुरन्स इत्यादी बाबींचा समावेश करणेत आलेला नाही. वरील प्रमाणे रक्कम संस्थानकडून संबधीत कंत्राटदारास कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणेकामी देणेत येईल.

९) **अ) प्रॉव्हीडंट फंड** : १३.०० %

(मालकाचा हिस्सा - १३.००%)

**ब) CGST – ९ % व SGST – ९ % मिळून एकूण GST** : १८ %

**क) सानुग्रह अनुदान (८.३३ %)** : ८.३३ %

**ड) कर्मचारी राज्य विमा निगम (ESIC) मालकाचा हिस्सा :** ३.२५%

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे रक्कम संस्थानकडून कंत्राटदारास देणेत येईल. निविदेचा भाग म्हणून निविदेतील प्रत्येक पानांवर नमूद केलेल्या अटी शर्ती मान्य असलेबाबत प्रत्येक पान सही शिक्यानिशी स्वःसाक्षांकीत करून द्यावेत.

निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्यानुसार कंत्राटदारावर येणाऱ्या सर्व कायदेशीर आर्थिक जबाबदाऱ्या विचारात घेऊन, आमचेमार्फत सदर व्यवसायीक निविदा सादर करण्यात येत आहे.

## -- हमीपत्र –

मी / आम्ही निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्यानुसार आमचेवर येणाऱ्या सर्व कायदेशीर आर्थिक जबाबदाऱ्या विचारात घेऊन, आमचेमार्फत सदर व्यावसायीक निविदा सादर करण्यात येत आहे.

खालील सही करणार मी / आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण संस्थानचे संकेतस्थळ व महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली ई-निविदा वाचली. आपल्या ई-निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून मला / आम्हाला मान्य आहेत. आपले अटी शर्तीचे पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे / आहोत.

मी / आम्ही आपणास ई-निविदेमध्ये नमूद केलेली अकुशल,कुशल व इतर कर्मचारी संख्या व वेळोवेळी मागणी प्रमाणे कर्मचारी संख्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना कंत्राटी पध्दतीने पुरविणे बाबतची हमी देतो. अटी व शर्तीनुसार कर्मचारी पुरविण्याची कामे नेमून दिल्याप्रमाणे व्यवस्थित करुन दिले जाईल.त्यात कुठलेही प्रकारची फसवणूक व हलगर्जीपणा करणार नाही. तसेच संस्थानचे मागणी नुसार कोणत्याही वेळेस कर्मचारी पुरविणे बाबतची पुर्तता करुन देण्याची हमी आम्ही देत आहे / आहोत.

कार्यादेश प्राप्त झालेनंतर कामाची हमी म्हणुन अंदाजित वार्षिक बिलाच्या रकमेचा ३% सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून ३० दिवसाचे आत मी / आम्ही संस्थानकडे आरटीजीएसद्वारे अथवा डिमांड ड्रॉफ्ट द्वारे भरणा करणेची हमी देत आहे / आहोत.

आपला / आपली विश्वासू,

संस्थेचा शिक्का:-

(निविदाधारकाची सही व नांव)

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## Finanacial Bid "Bill of Quantity"

| | |
|---|---|
| Tender inviting Authority | :- SHRI SAIBABA SANSTAN TRUST, SHIRDI |
| Nature of work | :- Supply of Skilled & Unskilled Labourers/Personnels To All Sansthan Departments. |
| Tender No. | :- |
| Bidder Name | |

| Sr.No | Description | Rate in Percentage of Wages Only to be entered by the Bidder | |
|---|---|---|---|
| | | Percentage in Figures | Percentage in Words |
| 1 | Service Charges (in Percentage of wages only) for skilled, Unskilled and other Contract employees as mentioned on page No 1 of tender document (Excluding PF, ESIC, GST, Group Insurance, Ex-gratia, etc.) | | |

(निवीदा फॉर्ममधील अटी व शर्तीचे अ.नं.२९ (अ) मध्ये नमुद केलेल्या सर्व कायदेशीर आर्थिक देणी (बाबी) व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, निविदाधारकांनी सर्व्हिस चार्जेसची टक्केवारी नमूद करावी.)

(Note:- If a firm quotes **'Nil'** charges /consideration, the bid shall be treated as unresponsive and will not be considered)

**निविदाधारकाचे नांव**

**(संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी)**

# E-TENDER DOCUMENT

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
**E – TENDERING**

**Tender details**

| | |
|---|---|
| **Department Name :** | **SHRI. SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI / LABOUR DEPARTMENT** |
| **Tender Reference Number:** | - |
| **Tender Type :** | Open Tender |
| **Form of Contract :** | percentage – Rate |
| **Tender category :** | Labour Supply |
| **Offline Payment Instruments** | **Bank** 1) SBI 2) CBI |
| **Details of Cover** | |
| **Fee / Pre Qual / Technical** | As per Tender Document Page No.16 to page no. 17. |
| **Finance** | As per Tender Document Page No.21. |
| **EMD Fee Details** | |
| **EMD Fee (INR) Rs.** | 4,00,000/- (Rs.Four Lacs only.) |
| **Fee payable To** | Chief Executive Officer |
| **Fee Payable at** | Shri Saibaba Sansthn Trust, Shirdi. |

**Work Description**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Tender Value (INR) Rs.** | | | **15,000/-** (Non-refundable) | |
| **Bid Validity (Days)** | **120** | **Days** | period of Work (Days) | 365 |
| **Prouct Category** | | | - | |
| **Contract Type** | | | Supply Skilled & Unskilled Labour & Others | |

**Critical Dates**

| | |
|---|---|
| **Tender Publish** | Date : 22 /05/2024 Time – 11:00 AM / PM |
| **Document Download / Sale Start** | Date : 22/05/2024 Time – 11:00 AM / PM |
| **Document Download / Sales End** | Date : 08/06/2024 Time – 05:00 AM / PM |
| **Bid Submission Start** | Date : 22/05/2024 Time – 11:00 AM / PM |
| **Pre-Bid Meeting Date** | Date : 28/05/2024 Time – 11:00 AM / PM |
| **Technical Bid & Financial Bid Submission Last Date** | Date : 08/06/2024 Time – 05:00 AM / PM |
| **Technical Bid Opening Date** | Date : 10/06/2024 Time – 11:00 AM / PM |
| **Name Of Head Of Department** | Ravindra Nawale |
| **Name Of Administrative Officer For the Department** | Sanjay Jori |

**Signature and Name**
**Head of Department**
**Labour.**

**Administrative Officer,**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi.**

(Goraksh Gadilkar, I.A.S.)
**Chief Executive Officer**
**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**